## राज्यशास्त्र
## २. स्वातंत्र्य आणि हक्क

**प्र. १ रिकाम्या जागा भरा.**
१. ‘ ऑन लिबर्टी ’ हा ग्रंथ जे. एस. मिल यांनी लिहिला.
२. ‘ स्वराज ’ ही संकल्पना महात्मा गांधी यांनी मांडली.

**प्र. २ दिलेल्या विधांनांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**
१. ८६ व्या घटनादुरुस्तीद्वारा भारताच्या संविधानात समाविष्ट करण्यार आलेला मूलभूत हक्क.
उत्तर : शिक्षणाचा हक्क
२. व्यक्ती आणि समाजाच्या सदसादविवेकबुद्धीवर आधारित हक्क.
उत्तर : नैतिक हक्क

**प्र. ३ योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा:**
१) राज्याने स्वातंत्र्यामध्ये अडथळे आणू नयेत, असे तत्त्व जेरेमी बेंथॅम यांनी मांडले;कारण व्यक्तिला आपले हित चांगले समजते.

**प्र. ४ सहसंबंध स्पष्ट करा :**
**१. नैसर्गिक हक्क आणि वैधानिक हक्क.**
उत्तर : १) नैसर्गिक हक्क हे मानवी स्वभावाचे व विवेकाचे अभिन्न अंग आहे. ते निसर्गातः प्रत्येक व्यक्तिला मानव म्हणून प्राप्त होतात.
२) वैधानिक हक्क हे राज्याकडून व्यक्तिला दिले जातात. त्यांचे स्वरूप आणि व्याप्ती राज्याद्वारा निश्चित केली जाते.
३) नैसर्गिक हक्क आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकर नाही, तर कोणत्या करणातस्व व्यक्तिला तिच्या हक्कांपासून वंचित केले जाईल हे कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

**प्र. ५ पुढील विधाने चूक की बरोबर ते स्पष्ट करा :**
१. वैधानिक हक्क हे सर्वत्र नसतात.
उत्तर : हे विधान बरोबर आहे.
कारण : प्रत्येक देशातील संविधान त्याच्या नागरिकांना (जनतेला) कोणते हक्क द्यायचे ते ठरवते.

**प्र. ६ दिलेल्या मुद्द्यांच्या  आधारे भेद स्पष्ट करा :**

| **नकारात्मक स्वातंत्र्य** | **सकारात्मक स्वातंत्र्य** |
|---|---|
| (अ) अर्थ<br>नकारात्मक स्वतंत्र म्हणजे व्यक्तीच्या वर्तनावर कोणत्याही प्रकारचे बाह्य बंधन नसावे. | सकारात्मक स्वातंत्र म्हणजे प्रत्येक व्यक्तिला स्वतःच्या क्षमतेनुसार स्वतःच्या सुप्त गुणांना वाव |

| | |
|---|---|
| | देणारे आचरण करणे. |
| (ब) स्वरूप<br>कोणतीही बाह्य शक्ती व्यक्तीवर वर्चस्व गाजवू शकत नाही. कोणत्याही बाह्य शक्तीच्या दडपणशिवाय व्यक्तिला हवे ते करण्याची पूर्व मुभा असते. | सकारात्मक स्वातंत्र्यात व्यक्तिला आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याची मुभा असते. त्यासाठी शासन व्यक्तीच्या विकासाच्या मार्गातील अडथळ दूर करते. |
| (क) कायद्याची भूमिका<br>नकारात्मक स्वतंत्र हे कायद्याच्या बंधनातून मुक्त असते. | सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्यविषयक अधिकार कायद्याने निर्धारित केलेल्या मर्यादेच्या आधीन राहून वापरण्याची व्यक्तिला असलेली मुभा होय. |

**प्र. ७ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**१. महात्मा गांधी यांनी त्यांचे स्वातंत्र्याविषयक विचार स्पष्ट करा.**
**उत्तर :** १. महात्मा गांधी यांनी त्यांचे स्वातंत्र्यविषयक विचार 'हिंद स्वराज' या पुस्तकात मांडले आहे.
२. महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यासाठी स्वराज ही संकल्पना स्वीकारली.
३. ' स्वराज ' या संकल्पनेत 'स्व' आणि 'राज' या दोन संकल्पना समाविष्ट आहेत. याचा अर्थ स्वतःवर असलेले राज्य म्हणजेच स्वराज.
४. त्यांची स्वातंत्यासाठीची संकल्पना व्यापक आहे. केवळ ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य नव्हे, तर पाश्चिमात्य संस्कृतिक वर्चस्वपासून मुक्तता असे त्यांना अभिप्रेत होते.
५. मानवी मूल्ये पायदळी तुडवणाऱ्यानपासून मुक्तता आणि स्वप्रतिष्ठा पुन्हा संपादन करणे म्हणजे स्वराज.
६. स्वयंशासन, स्वयंशिस्त, मानवी मूल्ये इत्यादींना महात्मा गांधी यांचा स्वातंत्र्याच्या-स्वराज्याच्या संकल्पनेत महत्व देण्यात आले होते.

**२. मानवी हक्क या संकल्पनेची चर्चा करा.**
**उत्तर :** १. मानवी हक्क म्हणजे ते हक्क की जे व्याक्तीस ती मानव आहे म्हणून प्राप्त होतात. हे हक्क आपल्याला जन्मतःच मिळतात. हे हक्क आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.
२. असे हक्क मानवाचे नैसर्गिक हक्क असतात. ते आपल्याला समाज किंवा राज्याकडुन मिळालेले नसतात. ते आपल्यापासून वेगळे करता येत नाही.
३. मानवी हक्क हे सार्वत्रिक असतात. कोणताही सामाजिक भेदभाव न करता ते प्रत्येक व्यक्तीस दिले जातात.
४. मानसतील मानवी गुणांचा, कौशलयांचा व बुद्धिमत्तेचा विकास होण्यासाठी हे हक्क आवश्यक असतात. माणसाची प्रतिष्ठा व मानवी मूल्यांचे संवर्धन होण्यासाठी हे हक्क आवश्यक समजले जातात.
५. जीवनाचा, उपजीविकेचा, अभिव्यक्ती व संघटना स्वतंत्र्य इत्यादी अधिकारांचा मानवी हक्कांमद्धे समावेश करण्यात येतो. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या मानवी हक्कांच्या सनदेत या हक्कांची विस्तृत मांडणी करण्यात आली आहे.
६. मानवी हक्कांमद्धे काळाप्रमाणे बादल होत असतात. २१ शतकात प्रदूषणमुक्त पर्यावरण आणि महितिचा अधिकार यांना मानवी हक्क म्हणून स्वीकृती मिळाली आहे.

**३. इसया बर्लिन यांचे स्वातंत्र्याविषयक विचार विशद करा.**
**उत्तर:** इसया बर्लिन या विचरवंताने त्याचे स्वातंत्र्याविषयक विचार १९५८ साली प्रसिद्ध झालेल्या Two concepts of Liberty या निबंधात मांडले आहेत. त्याने सकारात्मक आणि नकारात्मक असे स्वातंत्र्याचे दोन पैलू मांडले आहेत. ‘ मी कुणाचाही गुलाम नाही, ’ हे विधान नकारात्मक स्वातंत्र्य ; तर ‘ माझा मी मालक आहे ’ हे विधान सकारात्मक सकारात्मक स्वातंत्र्य दर्शवते.
बर्लिन यांच्या नकारात्मक स्वातंत्र्य आणि सकारात्मक स्वातंत्र्य पूढील प्रमाणे आहेत.
(अ) नकारात्मक स्वातंत्र्य : बरलींच्या मते नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या वर्तनवर कोणत्याही प्रकारचे बाह्य बंधन नसते. म्हणजेच व्यक्ति बंधनमुक्त असणे होय. नकारात्मक स्वातंत्र्य कायद्याच्या बंधांनपासून मुक्त असते.
(ब) सकारात्मक स्वातंत्र्य : बर्लिन यांच्या मते, सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक व्यक्तींचे स्वतःच्या क्षमतेनुसार स्वतःच्या सुप्त गुणांना वाव देनारे आचरण करणे.  सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे कायद्याने व्यक्तिला तिच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी अभिव्यक्तिस्वातंत्र्य, संस्कृतिक व शैक्षणिक हक्क इत्यादी स्वरुपात दिलेली मुफा होय.

**प्र. ८  दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**१) हक्कांची संकल्पना विषद करा :**
**उत्तर : अ) हक्कांचा अर्थ**
**ब) हक्कांचे वर्गीकरण**
**क) वैधानिक हक्क**
**ड) मानवी हक्क**
**उत्तर : अ) हक्कांचा अर्थ :** मनुष्याला जगण्यासाठी आणि स्वतःच विकास करण्यासाठी अनुकुल परिस्थिति आवश्यकता असते. प्रसिद्ध विचारवंत हॅरॉल्ड लास्की यांच्या मते, “ सामाजिक जीवनातील ज्या परिस्थितीच्या घटकांशीवाय व्यक्तिला आपली सर्वांगीण प्रगति सध्या करता येत नाही, त्या परिस्थितीच्या घटकांना हक्क (अधिकार ) असे म्हणतात° ”

**ब ) हक्कांचे वर्गीकरण : हक्कांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल :**
**१) नैसर्गीक हक्क :** नैसर्गिक हक्क हे मानवी स्वभावाचे आणि विवेकाचे अभिन्न अंग आहेत. हॉब्ज आणि लॉक या विचारवंतांच्या मते, राज्य पूर्व अवस्थेत, म्हणजे निसर्ग अवस्थेत मानव मुक्त होता आणि स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्याची मुभा त्यास होती. जीविताचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क हे नैसर्गिक आणि सार्वत्रिक स्वरूपाचे हक्क आहेत.
**२) वैधनिक हक्क :** राज्यकडून व्यक्तिला व्यक्तिला दिल्या जाणाऱ्या हक्कांना वैधानिक हक्क असे म्हणतात. राज्यघटना किंवा संहितीकरणात केलेल्या कायद्यानुसार हे हक्क दिले हातात. या हक्कांचे स्वरूप प्रत्येक राज्यात वेगवेगळे असते. कायद्यातील तरतुदींच्या मदतीने या हक्कांची अंमलबजावणी करण्यात येते.
**३) मानवी हक्क :** प्रत्येक व्यक्तिला ती मानव असल्यामुळे जे हक्क प्राप्त होतात, त्यांना मानवी हक्क असे म्हणतात. हे हक्क प्रत्येक व्यक्तिला जन्मतः मिळतात. ते आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. मानवी हक्क हे नैसर्गिक हक्क असतात. त्यांचे स्वरूप सार्वत्रिक असते. त्यांत जीवित, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, उपजीविका प्राप्त करण्याचा हक्क इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

**क) वैधिक हक्क :** राज्याद्वारा व्यक्तिला वैधिक हक्क दिले जातात. ते पुढील प्रकारचे असतात:
**१) नागरी हक्क :** व्यक्ति आणि व्यक्तीच्या मालमत्तेशी संबंधित हक्काना नागरी हक्क असे म्हणतात. त्यात

जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क यांचा समावेश होतो. राज्यकडून ह्या हक्कांचे संरक्षण करण्यात येते.

**२) राजकीय हक्क:** राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी व्यक्तिला राजकीय हक्काद्वारे प्राप्त होत असते. मतदानाचा हक्क, निवडणूक लढण्याचा हक्क, सार्वजनिक पदग्रहण करण्याचा हक्क, शासनावर टीका करण्याचा आणि त्यास विरोध करण्याचा हक्क इत्यादींचा समावेश होतो. समण्यातः लोकशाहीची शासनप्रणाली असलेल्या राज्यांत नागरिकांना राजकीय अधिकार असतात.

**ड) मानवी हक्क :** १. मानवी हक्क म्हणजे ते हक्क की जे व्याक्तीस ती मानव आहे म्हणून प्राप्त होतात. हे हक्क आपल्याला जन्मतःच मिळतात. हे हक्क आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.
२. असे हक्क मानवाचे नैसर्गिक हक्क असतात. ते आपल्याला समाज किंवा राज्याकडुन मिळालेले नसतात. ते आपल्यापासून वेगळे करता येत नाही.
३. मानवी हक्क हे सार्वत्रिक असतात. कोणताही सामाजिक भेदभाव न करता ते प्रत्येक व्यक्तीस दिले जातात.

**प्र. ९ उपयोजित प्रश्न :**

**१) मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरणामयात समाविष्ट असलेल्या हक्कांची यादी करा.**

**उत्तर :** १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा घोषित केला होता. त्यात समाविष्ट असलेले काही हक्क पुढील प्रमाणे आहेत :
१) प्रत्येक व्यक्तिला सामान्यपणे जगण्याचा हक्क आहे.
२) प्रत्येक व्यक्तिला अभिव्यक्तीचे, आत्मरक्षणाचे आणि धर्माचे स्वातंत्र्य आहे.
३) प्रत्येक व्यक्तिला शिक्षण, आरोग्य आणि रोजगारप्राप्तीचा हक्क आहे.
४) प्रत्येक व्यक्तिला मतदानाचा आणि राजकीय जीवनात सक्रिय सहभागाचा हक्क आहे.
५) वंश, जात, वर्ण, धर्म इत्यादींच्या आधारे व्यक्ति-व्याक्तिंत भेदभाव करता येत नाही. म्हणजे प्रत्येक व्यक्तिला समान दर्जा व संधीचा हक्क आहे.

**२) मानवी हक्क उल्लंघनाच्या उदाहरणांची चर्चा करा.**

**उत्तर :** मानवी हक्कांचे उल्लंघन देशातील सर्वच देशांत घडते. त्याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत.

**१) वांशिक संघर्ष :** अनेक देशांनी विविध वंशांचे आणि विविड धर्मांचे लोक असतात. त्यांत वंशीत श्रेष्ठत्वा वरुण संघर्ष उद्भवतात. श्रीलंकेतील वांशिक संघर्षात असंख्य निरपराध सिंहली व तामिळ नागरिकांची हत्या घडून आली. अमेरिकेत कृष्णवर्गीयांवर हल्ले करण्याच्या घटना वारंवार घडतात.

**२ ) पर्यावरणाची हानी :** विविध प्रकारच्या प्रदूषनामुळे पर्यावरनाची आणि मानवी शरीराची हानी होत असते. विकासाच्या नावाखाली जंगलांची मोठ्याप्रमाणात तोड केल्याने पऱ्यावरणाची हानी तर होतेच; परंतु त्याबरोबरच तेथील आदिवासी विस्थापित होतात आणि ते रोजगार, म्हणजेच उदरनिर्वाहाच्या साधंनापासून वंचित होतात.

**३) दलितांवरील अत्याचार :** भारताच्या राज्यघटनेने अस्पृश्यतेचे पालन करणे हा दक्खलपात्र गुन्हा घोषितकेला असला, तरी अजूनही दलितांवर होणाऱ्या अत्याचारच्या घटना वारंवार घडतात. दलितांना सन्मानाने जागता येत नाही.

**३) भारताच्या संदर्भात आपण जेव्हा हक्कांचा विचार करतो, तेव्हा कोणत्या हक्कांना आपण जास्त महत्व देऊ ?**

**उत्तर :** १) भारताच्या संदर्भात राजकीय आणि नागरी अधिकार महत्त्वाचे असले, तरी या देशातील ३०% हून

अधिक जनता दारिद्रीरेषेखाली जीवन जगत आहे.
२) दारिद्यरेषेखालील लोकांत त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता नाही.
३) पंडित नेहरू यांनी म्हटल्याप्रमाणे नागरी आणि राजकीय अधिकार दरिद्यात राहणाऱ्या लोकांकरीता निरर्थक असतात.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक आणि सामाजिक निर्मूलन करण्यास प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन केले होते.
५) म्हणून माझ्या मते अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण हे हक्क अधिक महत्वाचे आहेत. शासनाणे त्यास प्राधान्य देणे आणि त्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**४) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा : (उत्तर :)**

